# जिल्हाधिकारीतथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,नांदेड.

पत्ता :गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१, Email :nandedrdc@gmail.com

जा.क्र.२०२०/आरबी-१/डेस्क२/टे-४/crpc-१४४/प्र.क्र.- १३ दिनांक. १६ .०५.२०२०

वाचाः- १) या कार्यालयाचे समक्रमांकीत फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे आदेश, दिनांक १५.०४.२०२०, दिनांक १९.४.२०२० व सुधारीत आदेश दिनांक २१.४.२०२०

२) या कार्यालयाचे समक्रमांकीत शुध्दीपत्रक दिनांक २०.०४.२०२० व दिनांक २३.०४.२०२०

३) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५.

४) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचनाक्र. करोना २०२०/ प्रक्र.५८/ आरोग्य -५ दि.१४ मार्च,२०२०.

५) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, यांचे महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई आदेश क्रं. DMU/२०२०/CR-९२/DISM-१, दिनांक ०२.०५.२०२०, व दि.०३.०५.२०२०.

६) या कार्यालयाचे समक्रमांकीत आदेश दि.०३.०५.२०२०.

COLLECTOR & DISTRICT MAGISTRATE NANDED DIST.

**विषयः कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजना करणेबाबत. नांदेड जिल्ह्यात खालील दुकाने दिलेलया वेळेत अटी व शर्तीच्या अधीन राहून पुढील आदेशा पावेतो चालू ठेवणे बाबत.**

**<u>सुधारीत आदेश,</u>**

ज्याअर्थी या कार्यालयाचे संदर्भ क्रमांक ०६ वरील आदेशानुसार फौजदारी प्रक्रीया दंड संहिता १९७३ चे कलम १४४ (१)(३) अन्वये जिल्हयात मनाई आदेश दिनांक, ३ मे २०२० रोजी रात्री २४.०० वा. पासुन ते दिनांक १७ मे, २०२० रोजी मध्यरात्री २४.०० वा. पर्यंत नागरी, ग्रामीण व औद्योगिक क्षेत्रात संदर्भात नमूद या कार्यालयाचे समक्रमांकीत आदेश क्रमांक (१) व संदर्भ क्रंमाक (२) वरील शुध्दीपत्रकानुसार निर्गत आदेशातील अटी व शर्ती जशास तसे पुढील आदेशा पर्यंत लागू राहतील असे आदेशित करण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी शासनाचे संदर्भ क्र.०५ वर नमुद आदेशानुसार महानगरपालिका आणि नगरपालिका हद्दीतील शहरी भागातील सर्व मॉल्स, व्यापारी संकूल, आणि बाजारपेठ बंद राहतील. तथापि अशा व्यापारी संकूलातील व बाजारपेठेमधील अत्यावश्यक वस्तुंची विक्री करणारी दुकाने चालू राहतील तसेच सर्व एकल (Standalone-Single) दूकाने, वस्तीतील दूकाने, निवासी संकूलातील दूकाने कंटेनमेंट झोन वगळता शहरी भागात चालू ठेवण्यास व ग्रामीण भागातील सर्व दूकाने (मॉल मधील वगळून) चालू ठेवण्यास परवानगी असेल. वरील सर्व दूकाने चालू ठेवतांना सामाजीक अंतर (Social Distancing) चे पालन करणे अनिवार्य असेल असे निर्देशित आहे.

तथापि नांदेड शहरातील कोरोना विषाणूचे वाढते रुग्णांची संख्या लक्षात घेता जिल्हयात वरील प्रमाणे निर्देशाची जशास तशी अंमलबजावणी करणे शक्य नाही त्याच प्रमाणे कोरोणा विषाणूचा नांदेड जिल्हयात वाढता प्रादूर्भाव रोखण्यासाठी उपायोजनेचा एक भाग तसेच, जिल्हयातील नागरीकांची गैरसोय होवू नये म्हणून या पूर्वी काढलेल्या संदर्भात नमुद प्रतिबंधात्मक आदेशात अंशतः बदल करुन खालील तपशिलाप्रमाणे आस्थापनांना ठरवून दिलेल्या वेळेत व दिवशी चालु ठेवण्यास पुढील आदेशापावेतो कंटेनमेंट झोन वगळता, सामाजीक अंतर (Social

Darade PC CORONA

Scanned with CamScanner

पत्ता :गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१, Email :nandedrdc@gmail.com


Distancing) चे पालन व साबतचे जोडपत्र-१ मधील सुचनांचे पालन करण्याचे अधिन राहून परवानगी देण्यात येत आहे.

| वार | दुकानाचा प्रकार | वेळ |
|---|---|---|
| सोमवार ते शुक्रवार<br>(शनिवार व रविवार वगळून) | ॲटोमोबाईल्स<br>कॉम्पुटर /इलेक्ट्रॉनिक्स/इलेक्ट्रीकल्स<br>टायर्स<br>बॅटरी<br>मोबाईल शॉपी<br>रस्सी<br>वॉच स्टोअर्स<br>स्टेशनरी / बुक स्टोअर्स (पुस्तकालय)<br>सायकल स्टोअर्स<br>स्टील ट्रेडर्स<br>बिल्डीग मटेरीयल | सकाळी ०७.०० ते दुपारी ०२.०० |
| दररोज (रविवार वगळून ) | किराणा | सकाळी ०७.०० ते दुपारी ०२.०० |
| दररोज (रविवारसह ) | शेतीविषयक- बी, बियाणे, औषधे इत्यादी | सकाळी ०७.०० ते सांय. ०५.०० |
| दररोज (रविवारसह) | हॉस्पीटल, मेडीकल स्टोअर्स | २४ तास |

**<u>वरील दुकाने/आस्थापनाच्या ठिकाणी खालील उपाययोजना बंधनकारक असतील.</u>**

- कामाच्या ठिकाणी/दुकानात प्रवेशापुर्वी हॅन्डवॉश , सॅनिटायझरचा वापर करणे.
- एका वेळेस दुकानात ०५ पेक्षा जास्त ग्राहकास प्रवेश राहणार नाही.
- दुकानातील कर्मचारी व ग्राहक यांच्या चेह-यावर मास्क असणे व सामाजिक अंतराचे पालन करणे.
- मानवी संपर्कात येणा-या सर्व वस्तू/ठिकाणांचे वेळोवेळी नियमीत र्निजंतूकीकरण करणे.
- ग्राहकांकडून खरेदीनंतर पैश्यांची देवाणघेवाण आरबीआयच्या सुचनेनुसार ई वॉलेटस व स्वाईप मशीनव्दारे करणेस भर द्यावा.
- वरील नेमून दिलेल्या वेळेनंतर दुकान चालू ठेवल्यास तसेच उपाययोजनेचे भंग केल्यास रुपये ५०००/- एवढा दंड संबंधित दुकानदारास आकारण्यात येईल.
- दुपारी ०२.०० नंतर संदर्भात नमुद आदेशाप्रमाणे संचारबंदी / जमावबंदी आदेश कायम राहतील.

**<u>वरीलप्रमाणे आदेशाची अंमलबजावणीच्या देखरेखीसाठी पथके गठीत करुन पर्यवेक्षणाची जबाबदारी</u>**

- महानगरपालिका हद्दीत :- महानगरपालिका, पोलीस विभाग व उपप्रादेशिक परीवहन अधिकारी यांनी संयुक्त पथके गठीत करावीत.
- नगरपालिका हद्दीत :- नगरपालिका, पोलीस विभाग व उपप्रादेशिक परीवहन अधिकारी यांनी संयुक्त पथके गठीत करावीत.
- गावपातळीवर :- ग्रामपंचायत व पोलीस विभागाचे संयुक्त पथक गठीत करावे.

Darade PC CORONA


Scanned with CamScanner

# जिल्हाधिकारीतथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,नांदेड.

पत्ता :गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१, Email :nandedrdc@gmail.com

वरीलप्रमाणे सर्व संबंधित यंत्रणेने पर्यवेक्षणासाठी गठीत केलेले पथकाचे आदेश संबंधित उपविभागीय दंडाधिकारी तथा (Incident Commander) यांचेकडे सादर करावीत. संबंधित उपविभागीय दंडाधिकारी तथा (Incident Commander) यांची वरीलप्रमाणे आदेशाची अंमलबजावणीच्या अनुषंगाने संनियंत्रणाची जबाबदारी असेल.

या व्यतीरीक्त संदर्भात नमूद या कार्यालयाचे समक्रमांकीत आदेश क्रमांक (१) व संदर्भ क्रमाक (२) वरील शुध्दीपत्रकानुसार निर्गत आदेशातील अटी व शर्ती पुढील आदेशा पर्यंत लागू राहतील.

सदरील आदेशाचे पालन न करणा-या कोणतीही व्यक्ती,संस्था अथवा समुह हे साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ आणि भारतीय दंड संहिता १८८ नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल व कारवाई करण्यात येईल.

सर्व संबंधित यंत्रणांनी अत्यावश्यक साधने व सुविधा यांची साठेबाजी व काळाबाजार करणा-यां विरुध्द कठोर कारवाई करावी. तसेच वरील आदेशाची अंमलबजावणी करीत असतांना सद्‌हेतुने केलेल्या कृत्यासाठी कुठल्याही अधिकारी व कर्मचारी यांचेवर विरुध्द कुठल्याही प्रकारची कायदेशिर कारवाई अथवा खटला दाखल करता येणार नाही.

हे आदेश दि. १८.०५.२०२० रोजी माझे सही शिक्यानिशी निर्गमित करण्यात आली आहे.

**सोबतः- जोडपत्र-१**

(डॉ.विपीन इटनकर)भा.प्र.से.
**जिल्हादंडाधिकारी नांदेड.**

**प्रतिलिपी- माहीतीस्तव सादर**

१. मा.अपर मुख्य सचिव, गृह विभाग (विशेष) मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद.

**प्रतिलीपी – आवश्यक कार्यवाहीस्तव**

३. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
४. पोलीस अधिक्षक, नांदेड
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड
६. सर्व उपविभागीय दंडाधिकारी नांदेड जिल्हा
७. सर्व पोलीस उपविभागीय अधिकारी, नांदेड जिल्हा
८. सर्व तालुका दंडाधिकारी नांदेड जिल्हा
९. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, नांदेड.
१०. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नांदेड
११. व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड
१२. सहायक कामगार आयुक्त, नांदेड
१३. जिल्हा माहीती अधिकारी नांदेड

COLLECTOR & DISTRICT MAGISTRATE NANDED Dist.

**जिल्हादंडाधिकारी नांदेड.**

Darade PC CORONA

Scanned with CamScanner